# गौरवशाली इतिहासाला काळिमा



**उत्तर प्रदेशात ६५ हून अधिक गंभीर गुन्हे आणि गुन्हेगारीच्या माध्यमातून बेहिशेबी मालमत्ता जमवलेल्या आणि अजूनही राजकारणात आमदार, खासदार असलेल्या अन्सारी कुटुंबायीत मुख्तार अन्सारी आणि त्याचा परिवार संघटित गुन्हेगारीचा चेहरा बनला; मात्र गाझीपूरमध्ये त्यांचे कुटुंब राजकीय कुटुंब म्हणून ओळखले जाते. स्वातंत्र्यसैनिक, महावीर चक्र पुरस्कार विजेते, काँग्रेसचे अध्यक्ष अशी विविध कामगिरी करणारे हे कुटुंब नंतर गुन्हेगारीकडे कसे वळले, हा संशोधनाचा भाग आहे; परंतु केवळ भीतीपोटीच नाही तर कामामुळेही मुख्तार अन्सारी यांच्या कुटुंबाबद्दल परिसरातील गरीब लोकांमध्ये आदर आहे. मऊमधील अन्सारी घराण्याच्या आदराचे आणखी एक कारण आहे आणि ते म्हणजे या घराण्याचा गौरवशाली इतिहास.**

कौटुंबिक प्रभावाचा स्तर पूर्वांचलच्या कोणत्याही कुटुंबापेक्षा वेगळा आहे. माफिया मुख्तार अन्सारी याचे आजोबा डॉ. मुख्तार अहमद अन्सारी हे १९२६-२७ मध्ये स्वातंत्र्य चळवळीदरम्यान काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि ते महात्मा गांधींच्या अगदी जवळचे मानले जात होते. त्यांच्या स्मरणार्थ दिल्लीतील एका रस्त्याला त्यांचे नाव देण्यात आले आहे. त्यांचे चुल आजोबा नौशेरा युद्धाचे नायक होते. महावीर चक्र विजेते ब्रिगेडियर उस्मान हे मुख्तार अन्सारीचे आजोबा होते, हे कदाचित फार कमी लोकांना माहीत असेल. त्यांनी १९४७ च्या युद्धात भारतीय सैन्याच्या वतीने नौशेराच्या लढाईत भारताला विजय मिळवून दिला. त्या युद्धात ते हुतात्मा झाले. कुटुंबाचा हा वारसा मुख्तारचे वडील सुभानुल्लाह अन्सारी यांनी पुढे नेला. कम्युनिस्ट नेते असण्यासोबतच, सुभानुल्लाह अन्सारी हे त्यांच्या स्वच्छ प्रतिमेमुळे १९७१ च्या महापालिका निवडणुकीत बिनविरोध निवडून आले. इतकेच नाही तर भारताचे माजी उपराष्ट्रपती हमीद अन्सारी हेही मुख्तारचे चुलते आहेत. एवढा चांगला कौटुंबिक वारसा असतानाही माफिया डॉन मुख्तार अन्सारी अनेक गंभीर आरोपांनी घेरला होता. त्याने आपल्या कुटुंबाचा गौरवशाली वारसा संपवला. मुख्तार अन्सारी यांचा मुलगा अब्बास अन्सारी हा आंतरराष्ट्रीय शॉट गन नेमबाजी करणारा खेळाडू आहे. जगातील टॉप टेन नेमबाजांमध्ये समावेश असलेला अब्बास केवळ राष्ट्रीय चॅम्पियन ठरला नाही, तर त्याने जगभरात अनेक पदके जिंकून देशाचा गौरव केला आहे; पण आता तोही वडिलांच्या कृत्याची शिक्षा भोगत आहे. त्याला 'मनी लाँड्रिंग' प्रकरणात अटक करण्यात आली होती.

माफिया मुख्तार अन्सारी याचा उत्तर प्रदेशच्या बांदा तुरुंगात मृत्यू झाला. मुख्तार अन्सारीच्या मृत्यूनंतर अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया येत आहेत. उत्तर प्रदेशच्या राजकारणात आणि गुन्हेगारी जगतात मुख्तार अन्सारीचे नाव गाजले होते, यात शंका नाही. मुख्तार अन्सारीच्या मृत्यूपूर्वी काही दिवसांत घडलेल्या घटनांनी हे संपूर्ण प्रकरण सामान्य घटना राहिलेले नाही. मुख्तार अन्सारी याला तुरुंगात विष दिले जात असल्याचा आरोप त्याचा भाऊ अफजल अन्सारी याने केला आहे. मुख्तार अन्सारीच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्याची प्रकृती खालावली होती आणि त्याला तुरुंगातून वैद्यकीय महाविद्यालयात नेण्यात आले होते. त्यानंतर १२ तासांत त्याला अतिदक्षता कक्षातून काढून पुन्हा तुरुंगात टाकण्यात आले. त्याला विषबाधा झाली आहे, की तुरुंगात विष देण्यात आले, अशी चर्चा होती. तुरुंगात ज्या प्रकारे मुख्तार अचानक आजारी पडला आणि त्याला रुग्णालयात आणण्यात आले आणि त्यानंतर त्याच्या मृत्यूची घोषणा करण्यात आली, तेही विचार करायला भाग पाडते. बुलेटिनमध्ये मृत्यूची वेळ रात्री ८.२५ अशी नमूद करण्यात आली असली, तरी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास त्याची घोषणा करण्यात आली. बुलेटिन जारी करणे आणि घोषणा यात सुमारे दोन-अडीच तासांचा कालावधी गेल्याचे यावरून दिसून येते. प्रशासनाला परिस्थितीचा अंदाज घेण्यासाठी आणि वाट पाहण्यासाठी दोन तास लागले. आता या प्रकरणी चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. अन्सारीच्या मृत्यूनंतर मुस्लिम फॉलोअर्सबद्दल चर्चा झाली. त्याचे अनुयायी फक्त मुस्लिम आहेत असे नाही. १९९६ पासून मुख्तार अन्सारी राजकारणात आल्यापासून मुस्लिम समाजाचे नेते, की मुस्लिम माफिया अशी त्याची प्रतिमा निर्माण झाली आहे. वास्तविकता अशी होती, की गाझीपूर आणि मऊ या भागातील यादव, भूमिहार किंवा इतर मागास जातींसह अनेक बिगर मुस्लिम समाज मुख्तारच्या अगदी जवळचे होते. मुख्तार अन्सारी याचा विजय केवळ मुस्लिम मतांमुळे झाला नाही. त्याच्यावर डझनभर फौजदारी खटलेही दाखल होते, ज्यात खुनापासून दंगलीपर्यंतचे गुन्हे होते. १९९० च्या दशकात मऊमध्ये दंगल झाली, तेव्हा एक फोटो व्हायरल झाला होता. त्यात तो खुल्या जीपमधून त्याच्या समर्थकांसह शस्त्रे घेऊन जात होता. त्या वेळी त्याच्यावर दंगल भडकवल्याचा आरोप करण्यात आला होता. नंतर गुन्हाही दाखल करण्यात आला. मुख्तार याने मात्र दंगल शांत करण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून बाहेर पडल्याचे सांगितले. हा वाद मुख्तारशी आयुष्यभर राहिला. गेल्या सात वर्षात तीच त्याची ओळख झाली आहे. मुख्तार अन्सारीचे अनुयायी किंवा त्याचा प्रभाव पूर्वांचलच्या चार-पाच जिल्ह्यांवर आहे. त्यात बनारस ते बलिया, गाझीपूर ते मऊ या भागांचा समावेश आहे. मऊ हे ते ठिकाण आहे, जिथून मुख्तार सलग पाच वेळा आमदार झाला आणि त्यानंतर त्यांचा मुलगा सध्या तिथून आमदार आहे. तिथे मुख्तारच्या मृत्यूची बातमी ऐकून काही खळबळ किंवा प्रतिक्रिया उमटण्याची भीती प्रशासनाला आहे. मुख्तारची पत्नी अफसा अन्सारी ही फरार असून, उत्तर प्रदेशने सरकारने तिच्यावर बक्षीसही ठेवले आहे. त्याचा एक मुलगा तुरुंगात असून, दुसरा मुलगाही वादात असून त्याच्यावर द्वेषमूलक भाषणाचा खटला सुरू आहे. मुख्तार अन्सारी आणि अतिक अहमद हे असे लोक होते, ज्यांचा गेल्या सात वर्षांत माफिया म्हणून जास्त दरारा होता.

मुख्तार अन्सारी याच्यावर अनेक आरोप झाले. काही प्रकरणांमध्ये शिक्षाही झाली. कृष्णानंद राय यांच्या हत्येप्रकरणीही त्याला मुख्य आरोपी बनवण्यात आले आणि उत्तर प्रदेशात माफियांविरुद्धच्या लढाईच्या नावाखाली मुख्तार आणि अतिक यांना अटक झाली. त्यानंतर पोलिस कोठडीत अतिक अहमदची हत्या झाली, त्यावरून एकीकडे अतिक अहमदच्या हत्येमागे मोठा कट असल्याचा प्रचार सुरू झाला. दुसरीकडे मुख्तार हा माफिया बनलेला राजकारणी होता. मुख्तार याच्याबाबत अतिकसारखेच काहीतरी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. सध्या निवडणुकीचा काळ आहे. त्याच्या मृत्यूने विरोधकांच्या हाती आयते कोलित मिळाले आहे. कायदा आणि सुव्यवस्था हा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. मुख्तारच्या मृत्यूनंतर समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष, राष्ट्रीय जनता दल आदींनी ज्या पद्धतीने प्रतिक्रिया दिल्या, त्यावरून त्याचे भांडवल होणार हे उघड आहे. मायावती मुख्तार अन्सारीला 'गरिबांचा मसिहा' म्हणत असत. त्याने बसपच्या तिकिटावर राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर काँग्रेसनेही ट्विट करून चौकशीची मागणी केली. त्याशिवाय या प्रकरणाची उच्चस्तरीय न्यायालयीन चौकशी करण्याची मागणीही अनेकजण करत आहेत. त्यामागचे कारण म्हणजे काही दिवसांपूर्वी त्याला कारागृहात विष दिले जात असल्याचा आरोप झाला होता. काही तुरुंग अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली होती. बनारसपासून पूर्वांचलपर्यंत मुख्तारच्या मृत्यूच्या घटनेचा कमी-अधिक परिणाम त्या सर्व जागांवर होणार आहे. मुख्तारचे क्षेत्र प्रभावित होईल. त्याचा मुख्य परिणाम गाझीपूरमध्ये होईल. हा परिणाम भारतीय जनता पक्षाला लाभदायक ठरणार नाही हे उघड आहे. त्या भागातील लोक, मुख्तारला आपले मानत होते. तो केवळ मुस्लिमांचाच नव्हे, तर सर्वांचा नेता होता. या घटनेमुळे ओमप्रकाश राजभर चांगलेच अडचणीत आले आहेत. मुख्तार अन्सारी याचा मोठा भाऊ अफजल अन्सारी गाझीपूर मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. त्याना नक्कीच फायदा होईल. कट्टर हिंदुत्ववादी मते भाजपच्या बाजूने जातील, अशी अपेक्षा आहे. उत्तर प्रदेशातील संपूर्ण लोकसभा निवडणुकीत मुख्तार अन्सारींचा मुद्दा चर्चिला जाईल आणि त्याचा कमी अधिक परिणाम होईल.

# नाशिककरांची रंगपंचमी उत्साहात साजरी



**नाशिक** - राज्यातील बहुतांश ठिकाणी धुलीवंदनाच्या दिवशी रंग खेळला जातो. मात्र,नाशिकमध्ये रंगपंचमीच्या दिवशीच रंगोत्सव साजरा करण्यात येतो. त्यानुसार आज पेशवे कालीन राहाडी मध्ये तसेच रेन डान्स च्या माध्यमातून शहरात सर्वत्र उत्साहात रंगोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. नाशिक शहरात सहा पेशवे कालीन राहाडी असून त्या आठ दिवसांपूर्वीच उघडण्यात आल्या होत्या.

या रहाडी म्हणजेच हौदांचे विधिवत पूजन करण्यात आले. दुपारी दोन वाजेच्या सुमारास मानकऱ्यांच्या हस्ते विधिवत पूजा केल्यानंतर नैसर्गिक रंग या हौदामध्ये तयार करण्यात आला आणि त्यानंतर राहाडी मध्ये उड्या म्हणजे धप्पा घेऊन रंगोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान, दुपारी दोन ते पाच अशी पोलिसांनी राहाडी मध्ये रंगोत्सव खेळण्याची वेळ पाच वाजेपर्यंत दिली असताना अर्धा तास वाढवून देण्यात आला त्यानुसार साडेपाच वाजेपर्यंत रंगपंचमी साजरी करण्यात आली दरम्यान शहराच्या विविध भागांमध्ये सार्वजनिक ठिकाणी देखील रंगोत्सव साजरा करण्यात आला.नाशिक पोलिसांच्या वतीने पोलीस आयुक्तालय आणि पत्रकार यांच्यामध्ये रंगपंचमी साजरी करण्यात आली तर जनस्थान ग्रुपच्या वतीने नाशिक मधील कलावंतांचे रंगमंचमी साजरी करण्यात आली या नाशिक मधील नाटकातील तसेच विविध मालिकांमधील काम करणारे कलाकार सहभागी झाले होते.

# एमआयडीसीतील विनावापर भूखंड गरजूंना देण्याचा शासनाचा निर्णय



**सांगली** : औद्योगिक वसाहतींमधील वापराविना असलेले भूखंड गरजू उद्योजकांना देण्याचा निर्णय महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने घेतला आहे. उद्योगांसाठी जागेची मागणी मोठ्या प्रमाणात असतानाही भूखंड अडवून ठेवण्यात येत असल्याने हस्तांतराचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यभरात महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रासाठी बऱ्याच वर्षांपूर्वी भूसंपादन करण्यात आले आहे. त्यातील बहुतांश भूखंडांचे वाटपही झाले आहे. त्यामुळे सध्या नव्याने मागणी करणाऱ्या उद्योजकांसाठी वसाहतीत भूखंड उपलब्ध नाहीत. नव्याने भूसंपादनावरही मर्यादा आहेत. यामुळे राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळण्यात अडचणी येत आहेत. गुंतवणूक वाढीलाही खो बसत आहे.

औद्योगिक वसाहत सुरु होताना अनेक उद्योजकांनी भूखंड घेतले, पण तेथे उद्योग मात्र सुरु केले नाहीत. हे भूखंड वर्षानुवर्षे वापराविना पडून आहेत. काही जागांवर उद्योग सुरु झाले, पण सध्या बंद आहेत. या उद्योगांना पुनः चालना देण्यासाठी महामंडळ प्रयत्न करणार आहे. पण त्यांची तयारी नसल्यास त्यांच्याकडील अतिरिक्त क्षेत्र महामंडळ परत घेणार आहे. तसेच हे भूखंड पोटभाड्यानेही देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासंदर्भात महामंडळाच्या ६ मार्चरोजीच्या बैठकीत चर्चा झाली. बंद उद्योगांच्या विनावापर जमिनी परत घेण्याचा निर्णय झाला.

संबंधित उद्योजक महामंडळाच्या परवानगीने रिकामा भूखंड पोटभाड्याने देऊ शकतो, तसेच हस्तांतरीतही करु शकतो. गरजेपेक्षा जास्त जागा घेतलेले उद्योजक अतिरिक्त जागा परत करु शकतात, त्यासाठी प्रचलित दराने उद्योजकाला रक्कम दिली जाईल. अर्थात, तत्पूर्वी भूखंडावरील कर्जाची परतफेड उद्योजकाने करणे आवश्यक आहे. उद्योग बंद पडला असेल, तरीही भूखंड परत घेण्यात येणार आहे. वापराविना असणाऱ्या भूखंडांचा आढावा प्रादेशिक कार्यालये आणि अभियांत्रिकी विभागाने घेण्याचे आदेश औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# कोल्हापूर-अहमदाबाद एक्स्प्रेससाठी सांगलीला ३३५ तिकिटांचा कोटा;प्रवाशांना दिलासा



**सांगली** : कोल्हापूर-अहमदाबाद एक्स्प्रेस अंतर्गत सांगली स्थानकावरून ३३५ तिकीटे वअहमदाबाद ते सांगली ३३५ तिकीटे असा कोटा मिळाला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.


अहमदाबादला जाणारी ही गाडी नेहमीच फुल्ल होते. त्यामुळे तिकिटांचा कोटा वाढल्याने येथील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. सांगली स्थानकावरून अनेक गाड्यांसाठी आता तिकिटाचा कोटा वाढत आहे. कोल्हापूर-अहमदाबाद एक्स्प्रेसकरिता येता - जाता मोठा तिकीट कोटा मिळाला आहे. प्रवासी संघटनांनीही याबाबत समाधान व्यक्त केले आहे. प्रवाशांनी या गाडीचे बुकिंग करताना स्टेशन सांगली व बोर्डींग स्टेशन सांगली लिहावे, असे आवाहन रेल्वे डेव्हलपमेंट ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे. कोल्हापूर - अहमदाबादसाठी सांगलीतून तिकीट कोटास्लीपर क्लास - २४९ तिकिटेएसी स्लीपर - ८६ तिकिटे एकूण - ३३५ तिकिटे

# मानकुराद आंबा १५०० रुपये डझन, हापूस ४०० रुपये किलो

**फोंडा** : राज्यातील विविध बाजारपेठांमध्ये मानकुरादआंबामागील काही दिवसांपासून दाखल होऊ लागला आहे. मागील काही काही दिवसांपूर्वी ३ हजार ते २५०० रुपयांचा दर होता. आता १५०० ते १२०० रु. डझन असा दर आहे. त्यामुळे काही ग्राहकआंबाखरेदीकडे वळले आहेत.सध्या फोंड्यात चांगल्या दर्जाचा व मोठ्या आकाराचा आंबा १५०० रुपये डझन, तर मध्यम १२०० रु. डझन अशा प्रकारे विकला जात आहे.

सध्या फोंडा बाजारपेठेत मानकुराद आंब्याबरोबर काही विक्रेत्यांकडे हापूस आंबा दाखल झाला असून, ४०० रुपये किलो, तर मल्लिका आंबा ३०० रुपये किलो दराने विक्री केला जात आहे.अनेकांचा आवडता मानकुराद आंबा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेला नसून, येत्या काही दिवसांत मानकुरादचा पुरवठा आणखी वाढणार आहे. सध्या मानकुरादचे वाढलेले दर सर्वसामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे अनेकांच्या खिशाला आंबा न पडणारा झाला आहे. त्यामुळे काही ग्राहक दर कधी कमी होईल, याची प्रतीक्षा करत आहेत.याविषयी विक्रेत्यांनी सांगितले की, मागील काही दिवसांपासून मानकुराद दाखल होऊ लागला आहे. काही दिवसांपूर्वी आंब्याचे दर तीन हजारपर्यंत पोहोचले होते. मात्र, सध्या काही ग्रामीण भागातून मानकुराद उपलब्ध होऊ लागल्यामुळे दर किंचित कमी होत चालले आहेत.

# निरादेवघर धरणात ३५ टक्के पाणी ; गतवर्षीच्या तुलनेत १५ टक्के साठा कमी



सोलापूर : ब्रिटिशकालीन भाटघर धरणात ३३ टक्के, तर निरादेवघर धरणात ३५.८५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, गतवर्षीच्या तुलनेत १५ टक्के पाणीसाठा कमी आहे. भाटघर धरणातून १९८७ क्युसेकने तर निरादेवघर धरणातून ७५० क्युसेकने पाणी सोडले जात आहे. सध्या दोन्ही धरणांतून २,७४० क्युसेकने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे पुढील काळात पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार आहे.

भाटघर धरणाची क्षमता ३४ टीएमसी तसेच निरादेवघर धरणाची क्षमता ११.९१ टीएमसी पाणीसाठा याप्रमाणे आहे. ही दोन्ही धरणे गतवर्षी १०० टक्के भरली होती. मागील वर्षी या कालावधीत भाटघरमध्ये ४२ टक्के तर निरादेवघर धरणात ५५.३५ टक्के पाणीसाठा होता. त्यानुसार यावेळी भाटघर धरणात १० टक्के तर निरादेवघर धराणात १५ टक्के पाणीसाठा कमी आहे. वीर धरणात सध्या ४५.४० टक्के तर गुंजवणी धरणात ४४.२३ टक्के पाणीसाठा असून, गतवर्षी याच कालावधीत वीर धरणात ६३.८८ टक्के तर गुंजवणी धरणात ६०.२७ टक्के पाणीसाठा होता. म्हणजेच गतवर्षीच्या तुलनेत दोन्ही धरणांत १८ टक्के पाणीसाठा कमी आहे.

## पाणीटंचाईची शक्यता

**वीर धरणातून निरा डाव्या कालव्यात ८२७ क्युसेकने तर निरा उजव्या कालव्यातून १,५५० क्युसेकने पाणी शेतीसाठी आणि पिण्यासाठी सोडण्यात येत आहे. दोन्ही कालव्यांतून फलटण, बारामती, इंदापूर, माळशिरस, पंढरपूर, सांगोला या पूर्वेकडील तालुक्यांना पाणी सोडण्यात येत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत सर्वच धरणांत सरासरी २० टक्के पाणीसाठा कमी असून, सध्या धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तो असाच कायम राहिल्यास पुढील अडीच महिन्यांत धरणे रिकामी होऊन पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण होऊ शकेल.**

# गाढव झाले 'लाख'मोलाचे रंगपंचमी यात्रेत पंजाबी गाढवांनी खाल्ला भाव



**तिसगाव** : श्रीक्षेत्र मढी (ता. पाथर्डी) येथील रंगपंचमी यात्रेत शनिवारी गाढवांनी भाव खाल्ला. पंजाबच्या जाफरानी जातीची गाढवे दोन लाख रुपये जोडी, काठेवाडीची जोडी एक लाख तर, गावरान वीस ते पन्नास हजार रुपयांना प्रतवारीनुसार विकली गेली. सुविधांची वानवा अन् सुरक्षिततेची हमी नसल्याने बहुतांश विक्रेत्यांनी तिसगाव-पाथर्डी महामार्गालगतच विक्रीच्या दावणी लावल्या. मढी व तिसगाव अशा दोन ठिकाणी बाजार विखुरला गेला

पुणे येथील व्यापारी सुनील पवार म्हणाले, तिसगाव वाहतुकीचे दृष्टीने सोयीचे आहे.

गर्दीचा त्रास कमी होतो. मढीत जायची गरजच नाही. गावरान व वयस्कर गाढवांना तीन दिवस उलटले तरीही गिऱ्हाईक नसल्याची खंत बाळकृष्ण माने यांनी व्यक्त केली. आंध्र, तेलंगणातील दलालांनी वाढीव दर देत प्रतवारीची गाढवं खरेदी केली.गाढविणीच्या दुधाला नऊ हजारांचा भाव...

काही ग्राहक तर गाढविणीच्या दुधाची मागणी करीत असल्याचे चित्र नजरेस आले. दहा मिली दूध दोनशे रुपये, तर या दुधाचा प्रतिलिटर दर थेट नऊ हजार रुपये असल्याचे गाढव विक्रेते युवराज गायकवाड यांनी सांगितले.

राज्यात जेजुरी, जुन्नर, माळेगाव, सोनारी येथे गाढवांचा बाजार भरतो. मात्र, यापैकी श्रीक्षेत्र मढीचा बाजार सर्वात मोठा अन् मध्यवर्ती ठिकाण मानले गेले आहे. त्यामुळे गुजरात, कर्नाटक, आंध्र, पंजाब येथून व्यापारी दाखल झाले होते. . बाबूभाई गाजीभाई या दोन भावांनी गुजरात येथून ८० गाढवे आणली होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# ...तर विराटनं केकेआर विरुद्ध १२० धावा केल्या असत्या

## माजी क्रिकेटपटूनं आरसीबीच्या फलदाजांचे कान टोचले

आयपीएल मध्ये काल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला कोलकाता नाईट रायडर्सकडून पराभवाचा सामना करावा लागला. आरसीबीनं पहिल्यांदा बॅटिंग करताना ६ विकेटवर १८२ धावा केल्या होत्या. आरसीबीच्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करत कोलकाता नाईट रायडर्सनं ७ विकेट राखून विजय मिळवला. आरसीबीकडून सर्वाधिक ८३ धावा विराट कोहलीनं केल्या. विराट कोहलीशिवाय (%गैरू खदप्त) बंगळुरुकडून कॅमेरुन ग्रीननं ३३ धावा केल्या तर ग्लेन मॅक्सवेलनं २८ धावांची खेळी केली. मात्र, केकेआरनं १८२ धावांचं आव्हान यशस्वीपणे पार केलं. विराट कोहलीच्या बॅटिंगचं कौतुक करत माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी आरसीबीच्या इतर फलंदाजांचे कान टोचले आहेत.

सुनील गावस्कर काय म्हणाले?

विराट कोहलीच्या फलंदाजीबाबत बोलताना सुनील गावस्कर म्हणाले नक्कीच त्यानं १२० धावा केल्या असत्या. विराट कोहलीला संघातील इतर फलंदाजांचा पाठिंबा आणि सहकार्य मिळायला हवं होतं. कोहली त्याच्या एकट्याच्या जबाबदारीवर किती करणार. क्रिकेट हा सांघिक खेळ आहे हा काही वैयक्तिक खेळ नाही, असं सुनील गावस्कर यांनी म्हणत आरसीबीच्या इतर खेळाडूंचे कान टोचले आहेत.

विराट कोहलीचं सलग दुसरं अर्धशतक


विराट कोहलीनं पंजाब किंग्ज विरुद्धच्या मॅचमध्ये ७७ धावा केल्या होत्या. विराट कोहलीनं केकेआर विरुद्धच्या मॅचमध्ये देखील त्याच प्रकारे कामगिरी केली आहे. विराट कोहलीनं ५९ बॉलमध्ये ८३ धावांची खेळी केली आहे. विराटनं या खेळीमध्ये ४ चौकार आणि ४ सिक्स मारले होते.

विराट कोहली आणि गौतम गंभीरची भेट

विराट कोहली आणि गौतम गंभीर यांच्यामध्ये यापूर्वी अनेकदा तणावाचं वातावरण पाहायला मिळायचं. विराट कोहली आणि गौतम गंभीर हे कालच्या मॅचच्या निमित्तानं आमने सामने आले. यावेळी तणावाऐवजी दोन्ही खेळाडू एक दिलानं आमने सामने आले. हा प्रसंग पाहिल्यानं क्रिकेट चाहत्यांमध्ये देखील आनंदाचं वातावरण आहे.

आरसीबीचा दुसरा पराभव

फाफ डु प्लेसिसच्या नेतृत्त्वातील रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुची टीम होम ग्राऊंड असलेल्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सलग दुसऱ्या सामन्यात विजय मिळवण्याच्या इराद्यानं मैदानात उतरली होती. आरसीबीनं पहिल्यांदा बॅटिंग करताना ६ विकेटवर १८२ धावा केल्या होत्या. केकेआरनं ७ विकेटनं विजय मिळवला. आरसीबीनं यापूर्वी चेन्नईकडून पराभव स्वीकारला होता. तर, पंजाब किंग्ज विरुद्ध विराट कोहली आणि दिनेश कार्तिकच्या खेळीच्या जोरावर त्यांनी विजय मिळवला होता.



# गौतम गंभीर-विराटने गळाभेट का घेतली? वरिष्ठ खेळाडूने केला खुलासा 'उगाच सीमा ओलांडून....'

आयपीएलमध्ये शुक्रवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि कोलकाता नाईट रायडर्स संघ आमने-सामने आले होते. या सामन्यात सर्वाचं लक्ष गौतम गंभीर आणि विराट कोहली यांच्याकडे होतं. याचं कारण मागील हंगामात दोघांमध्ये फार मोठा वाद झाला होता. दोघे एकमेकांच्या अंगावर धावून गेले होते. पण या हंगामात मात्र दोघेजण एकमेकांची गळाभेट घेताना दिसले आणि चाहत्यांना अनपेक्षित धक्का बसला. स्टॅटेजिक टाइम आऊट झालेला असताना दोघेजण आमने-सामने आले आणि हात मिळवला. दोघांनी एकमेकांना मिठीही मारली.

मागील हंगामात गौतम गंभीर लखनऊ सुपरजायंट्स संघात होता. बंगळुरुविरोधातील सामन्यात विराट कोहली आणि नवीन उल-हक मैदानावर भिडले होते. सामना संपल्यानंतर हा वाद आणखीनच वाढला होता. याचं कारण गौतम गंभीर या वादात पडला आणि थेट विराटच्या दिशेने गेला होता. दोघांमध्ये टोकाची शाब्दिक चकमक झाली होती.

दरम्यान भारतीय क्रिकेट संघाचा माजी क्रिकेटर इरफान पठाणने गौतम गंभीर आणि विराट कोहलीच्या गळाभेटीवर भाष्य केलं आहे. ''गौतम गंभीर ज्येष्ठ खेळाडू आहे. तो खरंतर पुढे आला होता. कधीतरी तुम्ही लक्ष्मणरेषा ओलांडता. पण जेव्हा त्या गोष्टी भूतकाळ होतात, तेव्हा भविष्यात तुमची कधीतरी भेट होते. तुम्ही भविष्यात भेटता तेव्हा ती भेट प्रेमाने होते,'' असं इरफान पठाणने स्टार स्पोर्ट्सशी संवाद साधताना म्हटलं.

दरम्यान सामन्याबद्दल बोलायचं गेल्यास कोलकाताने ७ गडी राखून अत्यंत सहजपणे विजय मिळवला. कोलकाताने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. बंगळुरूने प्रथम फलंदाजी करताना १८३ धावसंख्या उभारली होती. विराट कोहलीने ८३ धावांची नाबाद खेळी केली.

कर्णधार फाफ डुप्लेसिस फ्क ८ धावा करु शकला. कॅमेरून ग्रीनने विराट कोहलीसोबत दुसऱ्या विकेटसाठी ६५ रन्सची भागीदारी केली. दिनेश कार्तिकने कोहलीसोबत सहाव्या विकेटसाठी ३१ धावांची भागीदारी केली. केकेआरकडून हर्षित राणा आणि आंद्रे रसेलने २-२ विकेट्स घेतले. तर सुनील नरीनला १ विकेट मिळाली.



सुनील नरीन आणि फिल सॉल्टने कोलकाताला चांगली सुरुवात करून दिली. दोघांनी ३९ बॉल्समध्ये ८६ धावांची भागीदारी केली. नरेनने २२ चेंडूंमध्ये ५ षटकार आणि २ चौकारांसह ४७ धावा केल्या. तर सॉल्टने २० चेंडूंमध्ये ३० धावा केल्या. सॉल्ट-नरेननंतर व्यंकटेश अय्यरने तुफानी खेळी केली. व्यंकटेश अय्यरने झंझावाती अर्धशतक झळकावत बंगळुरुला पराभवाच्या दिशेने नेलं. व्यंकटेश अय्यरने ३० चेंडूंमध्ये तीन चौकार आणि चार षटकारांच्या मदतीने ५० धावा केल्या.

## आपलं मनोरंजन



### अंकिता लोखंडे आणि विकी जैन स्टारर म्युझिक अल्बम 'ला पिला दे शराब' फर्स्ट लूक पोस्टर रिलीज

प्रसिद्ध टीव्ही अभिनेत्री अंकिता लोखंडे आपल्या बिझनेसमन पतीबरोबर 'ला पिला दे शराब' हा नव्या म्युझिक अल्बममध्ये दिसणार आहे. बिग बॉसच्या शेवटच्या सीझनमध्ये धमाका केल्यानंतर आता ही जोडी पुन्हा एकदा धमाल करायला येत आहे. अंकितानं 'ला पिला दे शराब' या गाण्याचा फर्स्ट लूक सोशल मीडियावर शेअर केला आहे. 'ला पिला दे शराब'ची रिलीज डेट अद्यापही समोर आलेली नाही. आता अंकिताचे चाहते तिच्या आगामी म्युझिक अल्बमची वाट पाहात आहेत. अनेकजण आपल्या प्रतिक्रिया या पोस्टवर देत आहेत.

अंकिता लोखंडेचा म्युझिक अल्बम : या पोस्टरमध्ये अंकिता निळ्या रंगाच्या अनारकली सूटमध्ये दिसत आहे. फोटोत विकी आणि अंकिता एकमेकांकडे पाहत आहेत. विकीच्या हातात वाईनचा ग्लास आहे. काळी पॅन्ट आणि स्काय रंगाच्या शर्टमध्ये विकी जैन हा दारु शौकिनाच्या भूमिकेत दिसत आहे. अंकितानं नवीन गाण्याचं पोस्टर लॉन्च करत पोस्टमध्ये लिहिलं की, ''हा म्युझिक अल्बम लवकरच येईल.'' 'ला पिला दे शराब' हे गाणं लोकप्रिय गायक विशाल मिश्रा यांनी गायलं आहे. याशिवाय मनन भारद्वाजनं यांनी गाण्याचे बोल लिहिले आणि संगीतबद्धही केलं आहेत. तसेच गाण्याचं दिग्दर्शन मिहिर गुलाटी यांनी केलंय. हे गाणं टी-सीरीजची निर्मिती आहे. अंकिता आणि विकी बिग बॉसच्या शेवटच्या सीझनमध्ये एकत्र दिसले होते. 'स्वातंत्र्यवीर सावरकर' चित्रपटाबद्दल : बिग बॉसच्या घरामध्ये दोघांमध्ये खूप भांडणं होताना दिसली होती. यानंतर बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर पुन्हा एकदा हे जोडपे आपला सुखी संसार जगताना दिसत आहे. विकी आणि अंकिता अनेकदा एकत्र बॉलिवूडमधील पार्ट्यांमध्ये दिसतात. नुकताच अंकिताचा 'स्वातंर्त्यवीर सावरकर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर रिलीज झाला आहे. हा चित्रपट रुपेरी पडद्यावर काही खास कामगिरी करू शकलेला नाही.

# महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यांचा नातू होणार कपूर कुटुंबीयांचा जावई?

जान्हवी कपूर सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. गेल्या वर्षभरापासून अभिनेत्री शिखर पहारियाला डेट करत असल्याच्या चर्चा चालू होत्या. यानंतर जान्हवीने 'कॉफी विथ करण'मध्ये शिखर आणि तिच्या नात्याबाबत भाष्य केलं होतं. याशिवाय अभिनेत्रीने नुकतंय शिखर पहारिया आणि तिचा जवळचा मित्र ओरी यांच्याबरोबर तिरुपती बालाजीचं दर्शन घेतलं. त्यामुळे बोनी कपूर यांची लाडकी लेक लवकरच शिखरबरोबर संसार थाटणार असल्याच्या चर्चा आता रंगल्या आहेत. यावर स्वत: आता बोनी कपूर यांनी स्पष्टीकरण देत जान्हवी-शिखरच्या नात्यावर सूचक विधान केलं आहे.

बोनी कपूर यांनी नुकत्याच 'झूम'ला दिलेल्या मुलाखतीत जान्हवी आणि शिखर यांचं नातं आयुष्यभर टिकेल असा विश्वास व्यक्त केला आहे. ते म्हणाले, शिखर खूप गोड मुलगा आहे. जान्हवी त्याला ओळखत



सुद्धा नव्हती तेव्हापासून आम्ही दोघं मित्र आहोत. मला विश्वास आहे की, तो जान्हवीला कधीच सोडून जाणार नाही. शिखर नेहमीच आमच्या कुटुंबाच्या जवळ असतो. संपूर्ण कपूर कुटुंबीयांबरोबर त्यांचं खूप सुंदर बॉण्डिंग आहे. जेव्हा त्यांच्यात गोष्टी नीट नव्हत्या तेव्हा सुद्धा शिखर कायम आमच्याबरोबर होता.

शिखर नेहमी जान्हवी, माझ्या आणि अर्जुनच्या मदतीसाठी पुढे येतो. आम्ही खरंच भाग्यवान आहोत. असं बोनी कपूर यांनी सांगितलं. दरम्यान, शिखर पहारियाबद्दल सांगायचं झालं, तर तो महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा नातू आहे. सुशीलकुमार शिंदे यांच्या कन्या स्मृती शिंदे पहारिया यांचा शिखर मोठा मुलगा आहे. शिखरच्या लहान भावाचं नाव वीर असून तो लवकरच बॉलीवूडमध्ये पदार्पण करणार आहे.

# हेअर डायची ॲलर्जी येते ? काय कराल ?

हेअर डायची लर्जी ही तशी बऱ्याच जणांमध्ये दिसून येते. बरेच दिवस हेअर डाय लावल्यामुळे काळे केस हा आपल्या व्यक्तीमत्वाचा एक भाग होऊन जातो. त्यामुळे लर्जी आली तरी हेअर डाय लावणे सोडणे आपल्याला जीवावर येतं. आज आपण या हेअर डायच्या लर्जीबद्दल माहिती घेऊया.

हेअर डायची लर्जी ही हेअर डाय वापरल्यापासून कितीही महिन्यांनी किंवा वर्षांनी येऊ शकते. आपल्या शरीराला जर एखादे मोठे आजारपण आले, उदा विषाणूजन्य ताप ( ींळीरश्र षर्शींशी ), मलेरिया, हिवताप, कोविड, बाळंतपण, गर्भपात, लकवा, हार्ट अटॅक, मानसिक आघात घडणाऱ्या घटना, तर त्यानंतर आपल्या प्रतिकारशक्तीमधे थोडे बदल निर्माण होऊ शकतात व त्यामुळे नसलेल्या गोष्टींना लर्जी चालू होऊ शकते. हेअर डाय वापरल्यानंतर काही आठवडे किंवा महिने किंवा वर्षांनंतर लर्जी येण्याचे हे कारण असते.

हेअर डाय लर्जीची लक्षणे काय?

हेअर डाय लावल्यानंतर काही तासात किंवा एक दोन दिवसांमध्ये डोक्यामध्ये खाज येऊ लागते. लालट पुरळ येते. लर्जी जर जास्त प्रमाणात आली तर तेथून लस येते व त्यामुळे केसदेखील एकमेकांना चिकटतात. जिकडे केस कमी असतात ( उदाहरणार्थ पुढचा व वरचा भाग), तिथे जास्त हेअर डाय लागला जातो व त्यामुळे तिथे लर्जीदेखील जास्त प्रमाणात येते. हेअर डाय धुतल्यानंतर तो चेहऱ्यावर ओघळतो. त्यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला खाज येणे, कानांना खाज येणे, डोळे सुजमट बनणे, चेहरा लाल होणे, कपाळाला सूज येणे अशीही लक्षणे पाहावयास मिळतात. एखाद्याला झझऊ ची फारच जास्त लर्जी असेल तर त्याचा रक्तदाब कमी होऊन सर्व चेहरा व डोळ्यांना सूज येऊन ती व्यक्ती बेशुद्धदेखील पडू शकते. याला -परहिूश्ररुळी असे म्हणतात.

डोक्याची त्वचा जरा जाड व निबर असल्यामुळे काही जणांना डोक्याच्या त्वचेवर लक्षणे कमी पण कपाळ, डोळे, कान अशा ठिकाणी खाजरे पुरळ जास्त प्रमाणात येऊ शकते. रासायनिक कायम टिकणाऱ्या ( शिीरपशपीं ) हेअर डायमध्ये हायड्रोजन पेरॉक्साइड हा डेव्हलपर तसेच अमोनिया देखील असतो. त्यामुळे केस थोडे कडक होतात व सुके बनतात व त्यांच्या टोकांचे विभाजन होते (स्प्लिट एंड). हायड्रोजन पेरॉक्साईडच्या ब्लिचिंग इफेक्टमुळे केसांचा नैसर्गिक रंग कमी होतो व केस लवकर जास्त पांढरे दिसू लागतात. केसांचे जे बाहेरचे आवरण आहे ज्याला क्युटिकल म्हणतात त्याची हानी होते व त्यामुळे केस निस्तेज व शुष्क होतात. केसांखालील त्वचा देखील हायड्रोजन पेरॉक्साइड मुळे शुष्क बनते व कधीकधी डोक्याला खाज येऊन त्वचा लालट होऊ शकते. कायमच्या हेअर डाय मध्ये हायड्रोजन पेरॉक्साइड व अमोनिया असल्यामुळे असे दुष्परिणाम पाहावयास मिळतात. ते सेमी परमनंट हेअर डाय मध्ये नसतात. पण सेमी परमनंट हेअर डायचा रंग ६ ते ८ शाम्पूमध्ये उतरत जातो.

कधी कधी पूर्णपणे आयुर्वेदिक असलेल्या हेअर डाय मधील घटकांना देखील ( उदा मेंदी, नीळ, आवळा ) लर्जी येऊ शकते. किंबहुना आयुर्वेदिक डाय मधील मेंदी व नीळ ( ळपवळसे ) या घटकांनी कधी कधी चेहऱ्याला काळवंडलेपणाही येऊ शकतो. काही जणांना हेअर डायमुळे खाज व पुरळ येत नाही. पण हेअर डाय नुकताच लावून धुतल्यावर खाली चेहऱ्यावर उतरल्यामुळे कपाळ, नाक, गाल व कानाचा वरचा भाग हळूहळू काळपट होऊ लागतो. अर्थात ज्या प्रमाणात बरेच जण हेअर डाय लावतात, त्यामानाने चेहरा काळपट होण्याचे प्रमाण फार कमी जणांमध्ये दिसून येते. तसेच क्वचितच एखाद्याला हेअर डाय लावल्यामुळे तेथील त्वचा ही कोडासारखी सफेद होते व हेअर डाय लावणे चालूच ठेवले तर शरीरावर कोडाचे सफेद डाग देखील येऊ शकतात.

हल्ली ठराविक केस वेगळा रंग लावून हायलाईट करण्याची पद्धत बऱ्यापैकी प्रचलित आहे. हा देखील एक प्रकारचा रासायनिक रंगच असतो व त्याचीही क्वचित प्रसंगी लर्जी येऊ शकते. पण ती त्वचेच्या तेवढ्याच भागापुरती मर्यादीत राहते. रासायनिक हेअर डायमुळे मूत्राशयाचा कर्करोग होतो असे म्हटले जाते. तसा कर्करोग जे आपल्या केसांना हेअर डाय लावतात त्यांना होत नाही पण ज्यांचा हेअर डायशी आपल्या व्यवसायामुळे रोजचा संबंध येतो ( उदा.सलून व पार्लर मधील कर्मचारी ) त्यांना फार क्वचित प्रसंगी होऊ शकतो. त्यामुळे अशा व्यक्तींनी हेअर डाय लावताना रबरी हात मोज्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

हेअर डायची लर्जी आल्यास काय करावे?


एकदा का एखाद्या गोष्टीची लर्जी आली तर ती जाणे कठीण असते. लोक हेअरडायची लर्जी आहे हे माहीत असूनही अधेमध्ये हेअर डाय लावत राहतात व त्यामुळे त्यांची डोक्यांची त्वचा ही बरीच जाड बनते व भरपूर खाज येत राहते. त्यामुळे सर्वात पहिली गोष्ट म्हणजे ज्या हेअरडायची लर्जी आहे तो बंद करणे आवश्यक आहे. अशा वेळी लोक एका कंपनीचा हेअर डाय बंद करून दुसऱ्या कंपनीचा हेअर डाय चालू करतात. पण त्यामध्ये देखील झझऊ हे तेच रसायन असल्यामुळे लर्जी चालूच राहते. काहीजण आयुर्वेदिक आहे असं समजून काळी मेंदी वापरतात. पण निसर्गामध्ये मेंदी ही लालच असते. त्यामुळे काळ्या मेंदीमध्ये देखील झझऊ हा डाय असतोच. हेअरडायची लर्जी आहे असे वाटत असल्यास तो डाय पातळ करून कानापाठी एक चौरस इंच भागावर लावून पाहावा. त्यानंतर जर एक दिवसात तिथे लाली किंवा पुरळ आले तर ज्यामध्ये PPD आहे तो हेअर डाय वापरू नये. अशा व्यक्तींनी पूर्णपणे आयुर्वेदिक असलेला हेअर डाय वापरावा. आयुर्वेदिक हेअर डायमध्ये मेंदी, निळ, आवळा, भृंगराज, ब्राम्ही, जास्वंद, मंजिष्ठ इत्यादी गोष्टी असतात.

# चमकीला ट्रेलर लाँचमधील परफॉर्मन्स पाहून काही जण परिणीतीला म्हणाले, 'आज गाने की जिद्द ना करो'

परिणीती चोप्राच्या 'अमर सिंग चमकीला' चित्रपटात दिलजीत दोसांझ बरोबर पंजाबी गाणं गाताना दिसणार आहे. या बातमीनंतर इंटरनेटवर प्रतिक्रियांचा भडिमार झाला आहे. यापूर्वी तिनं गायनात आपला हात आजमवला असतानाही इम्तियाज अली दिग्दर्शित आगामी संगीतमय 'अमर सिंग चमकिला' चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च प्रसंगी तिनं गायन सादर केलं. तिच्या या गाण्याला नेटिझन्सकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला आहे. दिलजीत बरोबर स्टेजवर थेट पंजाबी गाणे परफॉर्म करणाऱ्या परिणीतीला टीका आणि प्रशंसा दोन्हीचा सामना करावा लागला.

इंस्टाग्रामवरील युजर्सच्या मतांकडे एक नजर टाकल्यालावर या प्रतिक्रियातील विविधता समजते. एकानं लिहिलं, ''छान छुपी प्रतिभा दडली आहे... तुझ्याकडेच जपून ठेव.'' दुसऱ्या एकानं एक क्लासिक गाण्याचा संदर्भ देत लिहिलं, ''आज गाने की जिद्द ना करो'' आणि पुढं त्यानं उपहासानं अश्रू आणणारे हास्य इमोजी टाकला आहे. आणखी एकानं तिच्या गाण्याबद्दल लिहिताना म्हटलं, ''तिच्या गाण्याबद्दल एका शब्दात सांगायचं तर : 'थांब' आता.''

परिणीतीच्या गायनादरम्यान दिलजीत दोसांझच्या चेहऱ्यावर उमटलेले भावही काही नेटिझन्सनी टिपले आहेत. काही जणांनी म्हटलं की, ''तिचं गाणं पाहून त्याचा चेहराच काय बोलायचं ते बोलून गेला.'' तिची चुलत बहीण मन्नारा चोप्राच्या गायनाशी आणि अगदी ज्येष्ठ संगीतकार अनु



मलिक यांच्याशीही परिणीतीच्या गाण्याची तुलना करण्यात आली. अशा प्रकारे परिणीतीला धारेवर धरण्याचा प्रयत्न नेटिझन्सनी केला आहे.

अशी एका बाजूला परिणीतीवर टीका होत असताना तिची बाजू घेणारे, प्रशंसा करणारेही काही कमी लोक नाहीत. एका युजरनं तिच्या प्रतिभेची कबुली दिली, ''ती खरं तर चांगली गाते, पण प्रामाणिकपणे, सांगायचं तर आज ती चांगली गायली नाही,'' असे आदरानं म्हटलंय. दुसऱ्याने आश्चर्य व्यक्त केले, ''वाह! इतका अप्रतिम आवाज. दिलजीत सुद्धा दंग झाला आहे.'' संमिश्र स्वागत झाल्यानंतरही काही श्रोत्यांनी तिच्या परफॉर्मन्सचे कौतुक केलं आणि, ''ती चांगले गाते आहे'' अशी कमेंट केली.

२०१७ च्या 'मेरी प्यारी बिंदू' या चित्रपटातील 'मान के हम यार नहीं' या रोमँटिक हिट गाण्यानं परिणीतीचा संगीत प्रवास सुरू झाला होता. शास्त्रीय गायनाचं प्रशिक्षण घेतलेली परिणीती चोप्रा आगामी म्यूझिकल फिल्ममध्ये दिग्गज पंजाबी गायक अमर सिंग चमकीलाची मैत्रीण अमरजोत कौरची भूमिका साकारणार आहे.

अमर सिंग चमकिला यांनी १९८० च्या दशकात गरिबीतून वर येत लोकप्रिय पंजाबी गायक म्हणून स्वत:ला प्रस्थापित केलं होतं. तो केवळ २७ वर्षाचा असताना त्याच्यावर एका कार्यक्रमाला पोहोचत असनाचा हल्ला झाला आणि यातच त्याचा दु:खद अंत झाला. त्याच्या जबरदस्त लाईव्ह परफॉर्मन्ससाठी ओळखल्या जाणाऱ्या, चमकिलाचा वारसा पंजाबच्या संगीत इतिहासात अतुलनीय आहे. ''अमर सिंग चमकीला'' हा चित्रपट नेटफ्लिक्स इंडियावर १२ एप्रिल रोजी रिलीज होणार आहे.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भारतरत्न पुरस्कार प्रदान

**दिल्ली :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज (३० मार्च २०२४) राष्ट्रपती भवन येथे आयोजित समारंभात भारतरत्न पुरस्कार प्रदान केले. पुढील मान्यवरांना राष्ट्रपतींच्या हस्ते भारतरत्न बहाल करण्यात आले:

पी.व्ही. नरसिंह राव मरणोत्तर. दिवंगत पी. व्ही. नरसिंह राव यांच्या वतीने त्यांचे पुत्र पी. व्ही. प्रभाकर राव यांनी भारतरत्न पुरस्कार स्वीकारला.

माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंग मरणोत्तर. स्वर्गीय चौधरी चरणसिंग यांच्या वतीने भारतरत्न हा पुरस्कार त्यांचे नातू जयंत चौधरी यांनी स्वीकारला.

डॉ. एम.एस. स्वामिनाथन मरणोत्तर. दिवंगत डॉ.एम.एस.स्वामिनाथन यांच्या वतीने त्यांच्या कन्या डॉ. नित्या राव यांनी भारतरत्न



पुरस्कार स्वीकारला.

कर्पूरी ठाकूर मरणोत्तर. दिवंगत कर्पूरी ठाकूर यांच्या वतीने, त्यांचे पुत्र रामनाथ ठाकूर यांनी भारतरत्न पुरस्कार स्वीकारला.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवनात आयोजित एका कार्यक्रमात देशातील चार व्यक्तींना सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देऊन सन्मानित केलंय. यात माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह, पी.व्ही. नरसिंह राव, कृषी शास्त्रज्ञ डॉ एमएस स्वामीनाथन आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांचा समावेश आहे.

अडवाणींचा घरी जाऊन करणार सन्मान : भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांनाही 'भारतरत्ना'ने सन्मानित करण्यात येणार होतं. मात्र, आज ते राष्ट्रपती भवनात हजर राहिले नसून, ३१ मार्च रोजी राष्ट्रपती त्यांच्या घरी जाऊन त्यांचा सन्मान करणार आहेत. अडवाणी वगळता इतर चारही व्यक्तींना मरणोत्तर 'भारतरत्न' देण्यात आला. त्यांच्या कुटुंबीयांनी राष्ट्रपतींकडून हा सन्मान स्विकारला.

कोणी स्विकारला 'भारतरत्न' : माजी पंतप्रधान नरसिंह राव यांचा 'भारतरत्न' पुरस्कार त्यांचा मुलगा पी व्ही प्रभाकर राव यांनी स्विकारला. तसंच कृषी शास्त्रज्ञ एम एस स्वामिनाथन यांचा 'भारतरत्न' पुरस्कार त्यांच्या कन्या डॉ. नित्या राव यांनी स्विकारला. तर कर्पूरी ठाकूर यांचा 'भारतरत्न' पुरस्कार त्यांचा मुलगा रामनाथ ठाकूर यांनी स्विकारला. माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह यांचा 'भारतरत्न' पुरस्कार त्यांचे नातू जयंत चौधरी यांनी स्विकारला.

आतापर्यत किती जणांना सर्वोच्च पुरस्कार : केंद्रानं यंदा ५ व्यक्तींना 'भारतरत्न' पुरस्कार देण्याची घोषणा केली होती. मदन मोहन मालवीय, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, भूपेन हजारिका आणि नानाजी देशमुख यांना २०१४ मध्ये सत्तेत आल्यानंतर मोदींच्या कार्यकाळात हा सन्मान मिळाला होता. २०२४ मधील ५ जण मिळून आतापर्यत हा सन्मान मिळविणाऱ्यांची संख्या ५३ होईल.

का मिळाला 'भारतरत्न' : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कर्पूरी ठाकूर यांना त्यांच्या १०० व्या जयंतीच्या एक दिवस आधी म्हणजेच २३ जानेवारी रोजी 'भारतरत्न' देण्याची घोषणा केली होती. कर्पूरी ठाकूर हे दोनदा बिहारचे मुख्यमंत्री आणि एकदा उपमुख्यमंत्री होते. मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी ते ओळखले जातात. त्याचप्रमाणे ९ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान मोदींनी डॉ. एम एस स्वामीनाथन, माजी पंतप्रधान पीव्ही नरसिंह राव आणि चौधरी चरण सिंह यांना 'भारतरत्न' (मरणोत्तर) देण्याची घोषणा केली होती. स्वामीनाथन हे कृषी शास्त्रज्ञ होते. त्यांना भारतातील हरित क्रांतीचं जनक म्हटलं जातं. नरसिंह राव हे देशाचे ९ वे पंतप्रधान होते. तर चरणसिंग हे भारताचे पाचवे पंतप्रधान होते. ते उत्तर प्रदेशचे ५ वे मुख्यमंत्री देखील होते. त्यांनी आपलं संपूर्ण आयुष्य शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि कल्याणासाठी समर्पित केलं होतं.

# आयसीएआर - सीसीएआरआय गोव्याच्या 'जायफळ टॅफी' आविष्काराला मिळाले पेटंट

**पणजी :** गोव्यातील भारतीय कृषी संशोधन परिषद - केंद्रीय तटीय कृषी संशोधन केंद्र (ICAR-CCARI) मधील डॉ. ए.आर. देसाई आणि त्यांच्या नेतृत्वाखालील चमूच्या ''जायफळ टॅफी तयार करण्याची प्रक्रिया आणि त्यापासून बनवलेले उत्पादन'' नावाच्या शोधाला पेटंट क्रमांक ५२८११९ (अर्ज क्रमांक २०१६२१०१२४१४, दिनांक ८ एप्रिल २०१६) प्रदान करण्यात आला आहे.

जायफळ, भारतातील एक महत्त्वपूर्ण मसाला पीक असून त्याची प्रामुख्याने जायफळ बी आणि गर यासाठी लागवड केली जाते. कापणीनंतर बहुतेक वेळा जायफळाचे बीज कोष शिल्लक राहतात. या शिल्लक उप-उत्पादनाची दखल घेत गोव्यातील आयसीएआर - सीसीएआरआय ने जायफळ बीज कोषांचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या उद्देशानेएक उपाय विकसित केला आहे - जायफळ बीज कोष टॅफी. या नाविन्यपूर्ण उत्पादनामध्ये महत्त्वपूर्ण पौष्टिक मूल्य असून ते ताज्या फळाच्या ८०-८५म भाग बनते आणि कृत्रिम संरक्षकांशिवाय सामान्य तापमानात १२ महिन्यांपर्यत सोयीस्करपणे साठवले जाऊ शकते. यामुळे हे उत्पादन एक टिकाऊ आणि किफायतशीर उपाय बनले आहे.

या नव्या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीमुळे, शेतकऱ्यांना पारंपरिक जायफळ मसाल्याच्या उत्पादनांमधून मिळणाऱ्या उत्पन्नाव्यतिरिक्त प्रत्येक झाडामागे ५,६०० रुपये अतिरिक्त वार्षिक उत्पन्न मिळणार आहे. हे उत्पादन तयार करण्याच्या प्रक्रियेची साधेपणा, त्यासाठी अगदी थोड्या उपकरणांची आवश्यकता आणि व्यावसायिक व्यवहार्यता या वैशिष्ट्यांमुळे कृषी-उद्योजकता, स्वयं-सहायता गट, लघु आणि मध्यम-स्तरीय अन्न उद्योग आणि कृषी-पर्यावरण पर्यटन केंद्रांसह विविध क्षेत्रांमध्ये त्याची व्यापक अंमलबजावणी होऊ शकेल.

या आविष्काराच्या तंत्रज्ञान हस्तांतरातून गोव्यातील नेत्रावली येथील मेसर्स तनशीकर स्पाइस फार्म आणि गोवा राज्य जैवविविधता मंडळ, गोवा या संस्थांनी आधीच यशस्वी व्यापारी उत्पादन सुरू केले आहे. हे नव उत्पादन म्हणजे सामाजिक - आर्थिक विकासाच्या दृष्टीने कृषी नवोन्मेषांच्या संभाव्यतेचा उपयोग करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

गोव्यातील आयसीएआर - सीसीएआरआय च्या इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट युनिटने पेटंट अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली तसेच कृषी क्षेत्रातील नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी संस्थेची बांधिलकी दर्शवली आहे.

# काँग्रेस नेत्यांनी दबाव टाकल्याचा आरोप करत किशोर गजभिये अपक्ष लढणार

**रामटेक :** रामटेक लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या अडचणी थांबत नसल्याचे चित्र आहे. काँग्रेसने रश्मी बर्वे यांना उमेदवारी जाहीर केली मात्र त्यांचे जात प्रमाणतपत्र पडताळणीत अपात्र ठरल्याने त्यांचा उमेदवारी अर्ज बाद झाला. हा काँग्रेससाठी एक धक्का होता. त्यानंतर आता रामटेकमध्येच काँग्रेसला दुसरा मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे नेते असलेले किशोर गजभिये यांनी आपण याच मतदारसंघातून अपक्ष लढणार असल्याचे तसेच काँग्रेसच्या सदस्यत्वाचा लवकरच राजीनामा देणार असल्याचे म्हटले आहे.

माध्यमांसमोर आपली भूमिका स्पष्ट करताना किशोर गजभिये म्हणाले, ''रामटेक लोकसभा मतदारसंघातून मी माझा उमेदवारी अर्ज भरला होता. हा अर्ज आधिक स्विकृत झालेला आहे. यामध्ये निवडणूक चिन्हही मला मिळाले आहे. जे मुक्त चिन्ह आहेत त्यातील प्रेशर कुकर हे चिन्ह मला मिळाले आहे.''

मला जिंकायचं आहे त्यामुळं कोणाला फटका बसतोय याची चिंता मी कशाला करु? मी सध्या काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिलेला नाही. पण लवकरच देणार आहे. मी उमेदवारी मागे घ्यावी यासाठी माझ्यावर दबाव होताच, त्यासाठी लोकांनी प्रयत्नही करुन पाहिले. पण यावर मी आत्ता जास्त भाष्य करणार नाही, असंही यावेळी गजभिये यांनी सांगितले.

गजभिये यांनी का केली बंडखोरी?

किशोर गजभिये यांनी काँग्रेसकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, माजी मंत्री सुनील केदार यांनी त्यांच्या नावाला कडाडून विरोध दर्शवला होता. त्यांनी रश्मी बर्वे यांच्या नावाचा आग्रह धरला होता. केदारांचा हट्ट काँग्रेसच्या नेत्यांनी पुरवल्याने गजभिये यांनी बंडखोरी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांनी वंचित बहुजन विकास आघाडीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.

वंचित बहुजन आघाडीने त्यांना उमेदवारी देण्याचं जाहीरसुद्धा केले होते. पण अचानक वंचितच्या वतीनं भाजपचे माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर चहांदे यांनीही उमेदवारी दाखल केली. त्यामुळे वंचितकडूनही गजभिये यांना डावलण्यात आले. त्यामुळे त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसने रामटेकमधून किशोर गजभिये यांना उमेदवारी दिली होती. त्यावेळी सुनील केदार आणि माजी ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी त्यांच्या नावाला उघडपणे विरोध केला होता.

# इटलीतील मुख्यालयात संमिश्र पद्धतीने आयोजित आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३ चा समारोप समारंभ संपन्न

**नवी दिल्ली :** अन्न आणि कृषी संघटनेने ने इटलीतील रोम शहरामधील अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात २९ मार्च २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३ च्या समारोप समारंभाचे आयोजन केले होते. संमिश्र पद्धतीने आयोजित या उच्च-स्तरीय कार्यक्रमात जगभरातील विविध देशातील प्रतिष्ठित मान्यवरांनी प्रत्यक्ष आणि दूरदृश्य प्रणालीमार्फत सहभाग घेतला होता. यामध्ये भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अतिरिक्त सचिव मनिंदर कौर द्विवेदी यांचाही समावेश होता.

यावेळी भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण विभागाच्या अतिरिक्त सचिव मनिंदर कौर द्विवेदी यांनी, भरड धान्याचा प्रचार आणि स्वीकार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या भारतातील विविध स्टार्ट-अप, उद्योग, शेतकरी उत्पादक संघटना तसेच भारताच्या भरभराट होत असलेल्या भरड धान्य परिसंस्थेचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

अन्न आणि कृषी संघटनेचे महासंचालक डॉ. क्यू डोंग्यू यांनी या समारोप समारंभाच्या उद्घाटनापर भाषणात, आंतरराष्ट्रीय समुदायाच्या भरड धान्याशी संबंधित उपक्रमांना पुढे नेण्याच्या वचनबद्धतेची प्रशंसा केली तसेच सर्वांसाठी अन्न सुरक्षा आणि पोषण साध्य करण्यात भरड धान्याच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर जोर दिला.

नायजेरियाचे मंत्री तसेच फेडरल रिपब्लिक ऑफ नायजेरियाचे अन्न आणि कृषी संघटने मधील स्थायी प्रतिनिधी यया अदिसा ओलायटन ओलानिरन यांनी भरड धान्याच्या आहारातील महत्त्वावर प्रकाश टाकला आणि नायजेरियातील शाश्वत कृषी पद्धतींमध्ये भरड धान्य लागवडीचा समावेश करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या धोरणांची माहिती दिली.

समारंभात त्यानंतर, आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३ अंतर्गत जगभरात भरड धान्याचा प्रचार आणि प्रभाव वाढवण्याच्या उद्देशाने जगाच्या विविध क्षेत्रांमध्ये आयोजीत विविध प्रकारच्या उपक्रमांची आणि कार्यक्रमांची आकर्षक चित्रफीत उपस्थीतांना दाखविण्यात आली.अन्न आणि कृषी संघटनेच्या उपमहासंचालक बेथ बेचडोल यांच्या समारोपीय भाषणाने समारंभाची सांगता झाली. बेचडोल यांनी २०२३ च्या आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष २०२३ च्या यशस्वीतेसाठी सर्व सहभागींचे अतूट वचनबद्धता आणि केलेल्या समर्पणाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि आंतरराष्ट्रीय वर्षाच्या समाप्ती नंतरही प्रचारात गती टिकवून ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ७० हून अधिक देशांनी पाठिंबा दर्शविलेल्या भारताच्या प्रस्तावानंतर, संयुक्त राष्ट्र महासभेने मार्च २०२१ मध्ये भरलेल्या ७५ व्या अधिवेशनात, २०२३ हे आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष म्हणून घोषित केले होते.

# 'या' तारखेपासून कॉल फॉरवर्डिंग सुविधा होणार बंद

**नवी दिल्ली :** सरकारनं कॉल फॉरवर्डिंग सेवा बंद करण्याच्या सूचना दूरसंचार कंपन्यांना दिल्या आहेत. येत्या १५ एप्रिलपासून ही सेवा बंद होणार आहे. सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांवर आळा घालण्यासाठी सरकारनं यासंदर्भात सूचना केल्या आहेत. ही सुचना णडडऊ वर आधारीत कॉल फॉरवर्डिंगसाठी आहे.

१५ एप्रिलपासून कॉल फॉरवर्डिंग सेवा बंद होणार आहे. मात्र, ही सेवा बंद करताना यासाठी पर्यायी सेवा उपलब्ध करुण देण्याच्या सूचना देखील सरकारमं दूरसंचार कंपन्याना दिल्या आहेत.

दूरसंचार कंपन्यांकडून ळएए आधारित अनेक सेवा प्रदान केल्या जातात. यामध्ये खचएख सुविधेपासून ते बॅलन्स चेक करण्यापर्यतच्या सुविधांचा समावेश आहे. यातीलच एक सेवा म्हणजे कॉल फॉरवर्डिंगची सुविधा. मात्र, ही सुविधा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देण्याच्या दूरसंचार कंपन्यांना सूचना फोनच्या संदर्भातत सायबर फसवणूक आणि सायबर गुन्हे होण्याची सरकारला भीती आहे, त्यामुळं सरकारनं USSD आधारीत कॉल फॉरवर्डिंगची सेवा बंद करण्याचा निर्णय घेतलाय.

दरम्यान, जरी सरकारनं दुरसंचार कंपन्यांना कॉल फॉरवर्डिंगची सेवा बंद करण्यास सांगितले असले तरी देखील पर्यायी व्यवस्था उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. ग्राहकांच्या संमतीशिवाय कोणत्यही प्रकारे कॉल फॉरवर्डिंगची सेवा सक्रिय करतायेणार नाही असं दुरसंचार कंपन्यांना सांगण्यात आलं

# पत्नीला 'भूत-पिशाच' म्हणणे कायद्याच्या चौकटीत, उच्च न्यायालयाचा निर्णय

**पटणा :** पाटणा उच्च न्यायालयाने नुकतेच दिलेल्या निर्णयाप्रमाणे, पतीने आपल्या पत्नीला ''भूत'' आणि ''पिसाच'' असे संबोधून शिवीगाळ करणे भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ए नुसार (पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून पत्नीवर केलेले क्रूर) 'क्रूरता' ठरणार नाही. न्यायमूर्ती बिबेक चौधरी यांनी भर दिला की अयशस्वी विवाहांमध्ये, घाणेरडी भाषा नेहमीच क्रूरतेच्या कक्षेत येत नाही.

हुंडा प्रतिबंध कायद्याच्या कलम ४९८अ आणि कलम ४ (हुंडा मागण्याचा दंड) अंतर्गत दोषी ठरवल्याच्या विरोधात पुरुष आणि त्याच्या वडिलांनी केलेल्या पुनरावृत्ती याचिकेवर कोर्ट सुनावणी करत असताना न्यायालयाने म्हटले आहे की, ''विरोधी पक्ष क्रमांक २ च्या विद्वान वकिलांनी गांभीर्याने आग्रह केला की एखाद्या व्यक्तीला ''भूत'' आणि ''पिसाच'' म्हणत शिवीगाळ करणे हे एक क्रूर कृत्य आहे. हे न्यायालय असा युक्तिवाद स्वीकारण्याच्या स्थितीत नाही. वैवाहिक संबंधात, विशेषत: अयशस्वी वैवाहिक संबंधात अशा काही घटना घडतात. ज्यात पती-पत्नी दोघेही घाणेरडी भाषा बोलून एकमेकांना शिवीगाळ करतात. तथापि, असे सर्व आरोप ''क्रूरतेच्या'' पडद्याआड येत नाहीत,''.

पाटनामध्ये पिता-पुत्रा विरोधात त्या व्यक्तीच्या सासरच्यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांनी आरोप केला होता की त्यांनी आपल्या मुलीकडून, आरोपी-पुरुषाच्या पत्नीकडून हुंडा म्हणून मारुती कारची मागणी केली होती. फिर्यादीने पुढे म्हटले आहे की, आपल्या मुलीला गाडी न दिल्याने तिच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या सर्व घटना महिलेच्या वडिलांना पत्राद्वारे कळविण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यानंतर, ट्रायल कोर्टाने पिता-पुत्र दोघांना दोषी ठरवत, कलम ४९८अ घ्झ्ण अंतर्गत एक वर्षाची सक्तमजुरी आणि हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलम ४ अंतर्गत सहा महिने सक्तम जुरी आणि १,००० दंडाची शिक्षा सुनावली. त्यामुळे नाराज होऊन याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.

याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की त्यांची शिक्षा सर्वांगीण आरोपावर आधारित होती आणि ट्रायल कोर्टाने याचिकाकर्त्यांवरील विशिष्ट आरोपांची कल्पना केली नाही. ते पुढे म्हणाले की, अत्याचाराचे आरोप असूनही तक्रारदाराच्या मुलीवर कधीही वैद्यकीय उपचार केले गेले नाहीत. याचिकाकर्त्यांनी असा युक्तिवाद केला की जिल्हा न्यायालय आणि अपील न्यायालयाने सर्व फिर्यादी साक्षीदार एकतर कुटुंबातील सदस्य आहेत किंवा माहिती देणारे त्याच गावात राहतात याचा विचार केला नाही.

# एक्झिट पोल प्रकाशित करण्यावर बंदी; निवडणूक आयोगाचा मोठा निर्णय

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीसंदर्भात निवडणूक आयोगानं शुक्रवारी अधिसूचना जारी केलीय. या अधिसूचनेनुसार, १९ एप्रिल रोजी सकाळी ७ ते १ जून रोजी संध्याकाळी ६.३० या वेळेत एक्झिट पोल आयोजित करणे, प्रकाशित करणे किंवा प्रचार करणे यावर बंदी घालण्यात आलीय. याबरोबरच इतरही अनेक निर्बंध निवडणूक आयोगानं घालून दिले आहेत.

एक्झिट पोलवर बंदी : निवडणूक आयोगानं एक अधिसूचना जारी केलीय, ज्यामध्ये १९ एप्रिल रोजी सकाळी ७ ते १ जून रोजी संध्याकाळी ६:३० दरम्यान एक्झिट पोल आयोजित करणे, प्रकाशित करणे किंवा प्रसिद्ध करणे यावर बंदी घालण्यात आलीय. याच काळात लोकसभेशिवाय चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसाठी वेगवेगळ्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यामुळं या पोलचा परिणाम इतर निवडणुकांवर पडू नये यासाठी खबरदारी म्हणून निवडणूक आयोगानं हा निर्णय घेतलाय.

निवडणूक सर्वेक्षण दाखवण्यास मनाई : गुरुवारी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत असंही स्पष्ट करण्यात आलंय की, लोकप्रतिनिधी कायद्याच्या तरतुदींनुसार, मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या ४८ तासांच्या कालावधीत कोणत्याही इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये कोणतेही जनमत सर्वेक्षण किंवा इतर कोणतंही निवडणूक सर्वेक्षण दाखवणं प्रतिबंधित केलंय. त्यामुळं निवडणुकीचं कव्हरेज करताना आता माध्यमांना खबरदारी घ्यावी लागणार आहे.

# सरकार आपले काम करण्यात कसूर करत असेल तर न्याय व्यवस्था हातावर हात ठेऊन बसू शकत नाही : न्या गवई

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई यांचे एक मोठे विधान समोर आले आहे. ''सरकार आणि त्यांच्या यंत्रणांचे निर्णय हे लोकांच्या अधिकारांवर गदा आणत असताना आणि कार्यकारी मंडळ त्यांचे कर्तव्य बजावण्यात कसूर करत असताना घटनात्मक न्यायालये हातावर हात ठेवून शांत बसू शकत नाही'' असे विधान गवई यांनी केले आहे. हार्वर्ड केनेडी स्कूल येथे व्याख्यान देत असताना त्यांनी हे विधान केले आहे. तसंच, कार्यकारी मंडळ (प्रशासन) आपलं कर्तव्य पार पाडण्यात अपयशी ठरत असताना भारताची न्यायव्यवस्था घटनात्मक आदर्श जोपासण्याचा प्रयत्न करत आहे, असंही ते म्हणाले आहेत. लाईव्ह लॉ या संकेतस्थळाने हे वृत्त प्रसारित केलं आहे.



'जनहित याचिकेकडे समस्या सोडविण्यासाठीचं एक साधन' : प्रशासनाच्या धोरण ठरविण्याच्या प्रक्रियेत सतत विसंगती दिसत असल्यामुळे न्यायालयीन हस्तक्षेपाची मागणी वारंवार होत आहे. अमेरिकेत जनतेला न्याय देण्यासाठी सोशल ॲक्शन लिटिगेशन (एअ‍थ) ला प्रोत्साहन देण्यात येतं. भारतात यालाच जनहित याचिका म्हणतात. जनहित याचिकेकडे समस्या सोडविण्यासाठीचं एक साधन म्हणून पाहिलं जातं असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

'मतदारांना नोटाचा पर्याय उपलब्ध' : न्यायमूर्ती गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडच्या निर्णयाची समकालीन उदाहरणं देत निवडणुका, मतदारांचे हक्क आणि लोकशाही मूल्यांना बळकटी देणारे सार्वजनिक धोरण ठरविल्याचं सांगितलं. यामध्ये निवडणूक रोख्यांची योजना रद्द करण्याच्या निर्णयाबद्दलही त्यांनी सांगितलं. तसंच, नोटाचा पर्याय उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय असेल ज्यामुळे निवडणुकीत मतदारांना सर्व उमेदवार नाकारण्याचा अधिकार मिळाला असा दाखलाही त्यांनी यावेळी दिला.

'न्यायालयीन पुनरावलोकन ही एक नवी घटनात्मक यंत्रणा' : भारतातील न्यायव्यवस्थेने हे दाखवून दिलं आहे की, जेव्हा कार्यकारी मंडळ आपलं कर्तव्य पार पाडत नाही. तेव्हा घटनात्मक न्यायालयं हातावर हात ठेवून बसले नाहीत. सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी न्यायिक पद्धतीने काम करत निर्णय घेणं महत्त्वाचं आहे. कारण त्यांनी घेतलेल्यांची वैधता आणि घटनात्मकता न्यायालयांकडून तपासली जाणार आहे असंही ते म्हणाले आहेत.

भारतीय राज्यघटना एक जिवंत दस्तऐवज : जनहित याचिका हे सामान्य माणसाला मिळालेले महत्त्वाचे अस्त्र असून त्याचे महत्त्व आणि शक्ती अधोरेखित करताना न्यायमूर्ती गवई म्हणाले, भारतीय राज्यघटना ही एक जिवंत दस्तऐवज आहे. त्यामुळे न्यायालयीन पुनरावलोकन ही एक नवी घटनात्मक यंत्रणा विकसित केली गेली आहे असंही ते म्हणाले आहेत.

# तीन दशकं दहशत माजवणाऱ्या गॅंगस्टर मुख्तार अन्सारीचा मृतदेह 'सुपुर्द-ए-खाक'; समर्थकांची मोठी गर्दी

**गाझीपूर :** गॅंगस्टर मुख्तार अन्सारी याचा मृतदेह 'नमाज-ए-जनाजा'नंतर त्याच्या आई-वडिलांच्या कबरीशेजारी 'सुपुर्द-ए-खाक' करण्यात आलाय. विशेष म्हणजे याठिकाणी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. तसंच कब्रस्तान परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी त्याच्या समर्थकांकडून मुख्तार अन्सारी जिंदाबाद अशा घोषणा देण्यात आल्या.

गुरुवारी रात्री झाला होता मृत्यू : बांदा तुरुंगात बंदिस्त गॅंगस्टर मुख्तार अन्सारीला गुरुवारी संध्याकाळी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्याला बांदा मेडिकल कॉलेजच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आलं. यादरम्यान रात्री १०.३० च्या सुमारास डॉक्टरांनी मुख्तारला मृत घोषित केलं होतं. यानंतर डीजीपी प्रशांत कुमार यांनी गाझीपूर, मऊसह पूर्वांचलमधील अनेक जिल्ह्यांमध्ये अलर्ट घोषित केला. मध्यरात्री मृतदेह घरी दाखल : जेलचे डीजी एसएन सबत यांनी दिलेल्या माहितीनुसार, ''माफिया मुख्तार अन्सारी रोजा ठेवत होता आणि गुरुवारी रोजा सोडल्यानंतर त्याची तब्येत बिघडली.'' दरम्यान, शुक्रवारी बांदा येथील वैद्यकीय महाविद्यालयात मुख्तारच्या मृतदेहाचं शवविच्छेदन करण्यात आलं. त्यानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास मृतदेह घेऊन रुग्णवाहिका गाझीपूरकडे रवाना झाली. रात्री दीडच्या सुमारास रुग्णवाहिका मृतदेह घेऊन गाझीपूर येथील मुख्तारच्या घरी पोहोचली. यावेळी त्याच्या निवासस्थानी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. सिबगतुल्लाह आणि अफजल अन्सारी हे मोठे भाऊही उपस्थित होते. आज सकाळी साडेदहा वाजता मुख्तारची अंत्ययात्रा घरातून निघाली. ११ वाजण्याच्या सुमारास मुख्तारचं पार्थिव 'सुपुर्द-ए-खाक' करण्यात आलं. मोठा मुलगा अनुपस्थित : १४ फेब्रुवारी २०२३ पासून कासगंज तुरुंगात बंद असलेला मुख्तार अन्सारी याचा मोठा मुलगा अब्बास अन्सारी वडिलांच्या मृत्यूच्या बातमीने रडला.